MHPU240013212021

**रे.मु.नं.१७२/२०२१ मधील निशाणी क्र.७१ व ७३ वरील संयुक्तीक आदेश**

**१.** प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी प्रस्तूतचे अर्ज त्यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा आदेश/कैफियत नाही' चा झालेला आदेश रदद् करण्यासाठी तसेच त्यांना कैफियत व मनाई अर्जास जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत व जबाब अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे कथनानुसार, प्रतिवादी क्र. २ यांना दि.१९.०८.२०२२ रोजी दाव्याचे समन्स मिळालेले असून ते बाहेरगावी राहत असल्यामुळे वकिलांना भेटून मुदतीत कैफियत व जबाब देवू शकले नाही. त्यामुळे न्यायालयाने त्यांचेविरुध्द दि.१८.०१.२०२३ रोजी दाव्यात 'एकतर्फा/कैफियत नाही' चा आदेश पारित केलेला आहे. सदर प्रतिवादींविरुध्द झालेला 'एकतर्फा/कैफियत नाही' चा आदेश रदद् होवून, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून, कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेकडून दावा मिळकत विकत घेतलेली आहे. वादीचा दावा मिळकतीशी काहीएक संबंध नव्हता. अशा परिस्थितीत सदर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सदर प्रतिवादींनी कैफियत व जबाब दाखल करण्यास जाणीवपुर्वक उशीर केलेल नाही. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास झालेला ८ महिन्यांचा विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजुर झाल्यास सदर प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वानुसार सदरचे दोन्ही अर्ज मंजुर करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे दिले. त्यांचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी अर्जात नमुद केलेले कारण व मागणी योग्य व

संयुक्तीक नसून जाणीवपुर्वक दाव्याचे कामकाज लांबण्याच्या उददेशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेले आहे. अर्जातील कथने हे वादीस मान्य नसून दावा हा निशाणी क्र. ५ चे सुनावणीकरीता नेमलेला आहे. अर्जात विलंबाबाबत कोणतेही कारण नमुद नाही. सबब, प्रतिवादींचा प्रस्तुतचे अर्ज फेटाळण्यात यावे अशी विनंती केली.

**४.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तूतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतरचा मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना दाव्याचे समन्सची बजावणी दि. १९.०८.२०२२ रोजी झाल्याचे दिसते. परंतु त्यांनी मुदतीत दाव्याचे कामी हजर होवून कैफियत दाखल केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे विरुध्द दि. १८.०१.२०२३ रोजी 'एकतर्फा/कैफियत नाही' चा आदेश पारित झालेला दिसून येतो. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी सदरचे अर्ज दि.१५.०७.२०२३ रोजी दाखल केलेले असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास ८ महिन्यांपेक्षा जास्त उशीर झालेला दिसतो. तसेच सदर प्रतिवादी यांनी सदर अर्जातील कथनांचे सत्यतेकरीता निशाणी क्र. ७२ व ७४ अन्वये प्रतिवादी क्र. ७ यांचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. शिवाय प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेकडून खरेदी घेतल्याचे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांची कैफियत व जबाब दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. शिवाय प्रस्तुत दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई मिळण्यासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी नं. ७ व ८ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने त्यांचे प्रस्तुतचे अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचेविरुध्द झालेला 'एकतर्फा/कैफियत नाही' चा आदेश रदद् करुन त्यांना त्यांची कैफियत

दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्च त्यांचेवर आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. ७१ व निशाणी क्र. ७३ हे मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी नं. ७ व ८ यांचे विरुध्द झालेला 'एकतर्फा/कैफियत नाही' चा आदेश रदद् करण्यात येतो. तसेच त्यांना कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला उशीर, वादींना एकत्रित रक्कम रू. ५००/— (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर, माफ करण्यात येतो. प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी दिलेली कैफियत, आदेशित खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

Digitally signed by MEGHA SHANKARRAO MALI
Date: 2023.11.27 18:10:06 +0530

घोडेगाव
दिनांक — २७.११.२०२३

(एम. एस. माळी)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव